महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४

दूरध्वनी क्र.०२२-२२८५०४७१ Email ID : directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र. राव्यक-ग्रागृ/1348 /२०२० दिनांक: 27/01/2021

प्रति,
कार्यकारी अध्यक्ष,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

विषय :- प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत डेमो हाऊस (Demo House) बांधकामाकरीता निधीची तरतूद व वितरण व्यवस्थाबाबत

संदर्भ :- या कार्यालयाकडील डेमो हाऊस बांधकामाबाबतच्या मार्गदर्शक सुचनांचे पत्र क्र.जा.क्र.राव्यक-ग्रागृ /९६८/२०२० दि. ३१.१२.२०२०

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये डेमो हाऊस बांधकामाकरीता मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | मुद्दा क्र | डेमो हाऊस बांधकामाबाबतच्या मार्गदर्शक सुचनांमधील मुद्दा | करण्यात आलेली सुधारणा |
|---|---|---|---|
| १ | ९.४ | याव्यतिरिक्त डेमो हाऊस बांधकामामध्ये राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण गवंडी प्रशिक्षणासाठी ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाकरीता ठेवलेल्या तरतुदीतून पुढील प्रमाणे खर्च करता येईल.<br>अ) प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस (TP) अदा करावयाची प्रशिक्षण फी / शुल्क - रु. ३८.५० X ८ तास X ४५ दिवस = रु. **१३,८६०/-** (यापैकी ३०% रक्कम अग्रिम स्वरुपात व उर्वरित ७०% रक्कम गवंडी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर अदा करता येईल)<br>ब) प्रशिक्षणार्थी गवंडी मानधन - ५ गवंडी X रु. ३५० X ४५ दिवस = रु. ७८,७५० /-<br>क) प्रशिक्षणार्थी गवंडी मूल्यमापन फी - रु. १२०० प्रती गवंडी X ५ गवंडी = रु.६००० /- | याव्यतिरिक्त डेमो हाऊस बांधकामामध्ये राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण गवंडी प्रशिक्षणासाठी ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाकरीता ठेवलेल्या तरतुदीतून पुढील प्रमाणे खर्च करता येईल.<br>अ) प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस (TP) अदा करावयाची रक्कम - रु. ३८.५० X ८ तास X ४५ दिवस = रु. १३,८६० /- प्रती गवंडी एकूण = १३,८६० X ५ (गवंडी) = **रु. ६९,३०० /-**(यापैकी ३०% रक्कम अग्रिम स्वरुपात व उर्वरित ७०% रक्कम गवंडी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर अदा करता येईल)<br>ब) प्रशिक्षणार्थी गवंडी मानधन-५ गवंडी X रु.३५० X ४५ दिवस= रु. ७८,७५० /-<br>क) प्रशिक्षणार्थी गवंडी मूल्यमापन फी -रु. १२०० प्रती गवंडी X ५ गवंडी = रु.६०००/- |

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | ड) उत्तीर्ण प्रशिक्षणार्थी गवंडी यास द्यावयाचे टुल किट - रु. १२०० प्रती गवंडी X ५ गवंडी एकूण खर्च = रु.६००० /-<br>गवंडी प्रशिक्षणाकरीताचा एकूण खर्च = **रु. १,०४,६१० /-** (प्रति डेमो हाऊस) | ड) उत्तीर्ण प्रशिक्षणार्थी गवंडी यास द्यावयाचे टुल किट- रु. १२०० प्रती गवंडी X ५ गवंडी = रु. ६००० /-<br>एकूण = ६९,३०० + ७८,७५० + ६००० + ६०००<br>गवंडी प्रशिक्षणाकरीताचा एकूण खर्च = = **रु. १,६०,०५०/-** प्रती डेमो हाऊस |
| २ | ९.६ | प्रकल्प अंमलबजावणी संस्थेने डेमो हाऊस बांधकामासाठी खरेदी करावयाचे बांधकाम साहित्य, मजुरी इ. बाबी विहित कार्यपध्दती अवलंबवून त्याची देयके गट विकास अधिकारी यांचेकडे सादर करावीत. गटविकास अधिकारी व सहाय्यक लेखाधिकारी यांच्या डिजीटल स्वाक्षरीने **PFMS** प्रणाली द्वारे सदरची देयके थेट पुरवठा दार/मजुर यांना अदा करता येतील. | प्रकल्प अंमलबजावणी संस्थेने डेमो हाऊस बांधकामासाठी खरेदी केलेले साहित्य, तसेच मजुरी यासाठीची देयके विहित कार्यपध्दती व्दारे गटविकास अधिकारी यांचेकडे सादर करावीत. गटविकास अधिकारी व सहाय्यक लेखाधिकारी यांच्या डिजीटल स्वाक्षरीने **AFMS** प्रणाली व्दारे सदरची देयके थेट पुरवठा दार/मजुर यांना अदा करण्यात यावीत तसेच **डेमो हाऊस बांधकामाकरिता AFMS मधील उपलब्ध निधी मधून तरतूद करण्यात यावी.** |

डेमो हाऊसचे काम पुर्ण झाल्यानंतर त्याचा लाभार्थ्यांना प्रात्यक्षिक (डेमो) दाखविणे सोबत माहिती कक्ष सारखा उपयोग करावयाचा आहे. त्याच्या अधिक शाश्वत उपयोगासाठी व लाभार्थ्यांना उपजिविकेचे साधन देणेसाठी त्यांच्या उत्पादनांचे विक्री केंद्र (Co-Op Shop ) म्हणुन करता येऊ शकेल.

बांधकाम पूर्ण झालेले डेमो हाऊस कॉप शॉप म्हणुन उपयोगात आणण्या करिता दर्शनी भागात मुख्य दरवाजाच्या बाजूला असणाऱ्या खिडकीचा उपयोग हा Service Counter म्हणुन करता येईल. करिता सदर खिडकीला Half Rolling Shutter बसवून डेमो हाऊस तयार करता येऊ शकेल. ( मार्गदर्शनपर आराखडा सोबत जोडण्यात आला आहे )

तरी उपरोक्त सुधारणानुसारच्या मार्गदर्शक सुचनांच्या आधारे प्रत्येक तालुक्यातील डेमो हाऊस बांधकामाची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी.

**(डॉ. राजाराम दिघे)**
संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

प्रत:-

१. मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
२. मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव.
३. उपायुक्त (विकास ), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
५. प्रशिक्षण संस्था, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रम (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

Scanned with CamScanner

# DEMO HOUSE  AS CO-OP SHOP










